जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २४१ | शुक्रवार, २७ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210




## संक्षिप्त

### पुण्यात भरदिवसा खून करणाऱ्या दोन गुन्हेगारांना जन्मठेप

**पुणे, ता. २६ :** कर्वे रोड परिसरात २०१६ मध्ये घडलेल्या एका खून प्रकरणात पुणे न्यायालयाने दोन आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात मृत्युपूर्वी दिलेला जबाब, वैद्यकीय अहवाल आणि साक्षीदारांच्या साक्षी यांच्या आधारे न्यायालयाने हा निर्णय दिला. प्रधान जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन यांनी हा निकाल दिला. या प्रकरणातील आरोपी संजय अनंत मोहोळ आणि संभाजी सदाशिव कांबळे अशी शिक्षा झालेल्यांची नावे आहेत. सागर शिवाजी शिंदे असे मृत तरुणाचे नाव असून ते कर्वे रोड परिसरात राहत होते. ते स्थानिक गणेशोत्सव मंडळाचे माजी अध्यक्षही होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वैयक्तिक वादातून ही घटना घडली होती. आरोपी आणि मृत व्यक्तीमध्ये यापूर्वी वाद झाले होते. या रागातून आरोपींनी सागर शिंदे यांचा पाठलाग करून त्यांच्यावर हल्ला केला. २३ फेब्रुवारी २०१६ रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास आरोपींनी वाहनाने धडक देऊन शिंदे यांना खाली पाडले आणि त्यानंतर कोयता व दगडाने मारहाण केली.

# तहसीलदार श्रीकांत पाटील, ज्योती देवरेसह १५ महसूल अधिकारी सक्तीच्या रजेवर

## ४२४ फेरफारात हेराफेरी; दोषींवर निलंबनासह कठोर कारवाईचे निर्देश

**पुणे, ता. २६ :** महसूल अभिलेखांमध्ये कलम १५५ चा गैरवापर करून सातबारावर जमिनीचा वर्ग, क्षेत्रफळ आणि मालकीत फेरफार केल्याच्या आरोपांवरून राज्यशासनाने मोठी प्रशासकीय कारवाई करत १५ महसूल अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. या कारवाईत पुण्यातील तत्कालीन तहसीलदार श्रीकांत पाटील, रवींद्र सबनीस, ज्योती देवरे आणि गीता गायकवाड यांच्यासह इतर अधिकाऱ्यांचा समावेश असल्याने महसूल विभागात खळबळ उडाली आहे.

पुणे जिल्ह्यात ४२४ फेरफार प्रकरणांत मोठी हेराफेरी झाल्याचे आढळून आले आहे. गेल्या पाच वर्षांत महसूल कायद्यातील तरतुदींचा गैरवापर करून ४२४ प्रकरणांमध्ये बेकायदेशीर कार्यपद्धतीचा अवलंब करून आदेश पारित केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणांशी संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनासह कठोर कारवाई करण्याची



घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

या प्रकरणात एकूण १५२ अधिकाऱ्यांवर ठपका ठेवण्यात आला होता. त्यापैकी १५ जणांवर प्रथम टप्प्यात कठोर कारवाई करण्यात आली असून उर्वरित ब व क वर्गवारीतील १३७ अधिकाऱ्यांवर पुढे काय कारवाई होणार, याकडे नागरिकांसह प्रशासनाचेही लक्ष लागले आहे. नाशिक विभागीय आयुक्तांच्या समितीने तपासलेल्या २,३३७ प्रकरणांपैकी १३ प्रकरणे अ वर्गवारीतील अतिगंभीर असल्याचे अधोरेखित केले आहे. या निष्कर्षानंतर राज्य शासनाने या प्रकरणाकडे गंभीरतेने पाहत कारवाईची प्रक्रिया गतीमान केली आहे.


महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यापूर्वीच दोषी अधिकाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही, असे स्पष्ट संकेत दिले होते. त्यानुसारच १५२ पैकी १५ अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवून शासनाने कठोर भूमिकेचा पहिला ठोस निर्णय घेतला आहे. सातबारातील फेरफार प्रकरणामुळे जमीन व्यवहारांबाबतचा विश्वास डळमळीत झाल्याची चर्चा सुरू असून, या कारवाईमुळे महसूल प्रशासनात पारदर्शकता आणि शिस्त प्रस्थापित करण्याचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

**सक्तीच्या रजेवर आदेश निर्गमित झालेल्या पंधरा अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे**

१) गीता गायकवाड (तत्कालीन अपर तहसीलदार, पिंपरी चिंचवड), उपजिल्हा निवडणूक अधिकारी, २) श्रीमती ज्योती देवरे (तत्कालीन तहसीलदार, खेड), अपर तहसीलदार, मालेगाव (नाशिक), ३) रविंद्र सबनीस (तत्कालीन तहसीलदार, जुन्नर), (तहसीलदार व सहाय्यक प्राध्यापक), रामेती (ठ्चएढ्ख) पुणे, प्राचार्य, रामेती, पुणे, ४) व्यंकटेश माधवराव भोसले (तत्कालीन मंडळ अधिकारी, जुन्नर, मंडळ अधिकारी, आंबेगाव), ५) प्रल्हाद पाटील (तत्कालीन महसूल सहायक, जुन्नर)महसूल सहायक, आंबेगाव), ६) श्रीकांत पाटील (तत्कालीन तहसीलदार, इंदापूर), विशेष भूसंपादन अधिकारी, धाराशिव, ७) मलाप्पा तम्मा ढाणे (तत्कालीन मंडळ अधिकारी, बावडा, इंदापूर, मंडळ अधिकारी, जुन्नर), ८) मधुसुधन बर्गे (तत्कालीन तहसीलदार, मावळ), उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), नागपूर, ९) मारुती महादेव चोरमले (तत्कालीन मंडळ अधिकारी, शिवणे, मावळ) सध्या निलंबित (१५-०७-२०२५ पासून), १०) अश्विनी व्यंकटराव गोरे (तत्कालीन ग्राम महसूल अधिकारी, शिवली, मावळ), ग्राम महसूल अधिकारी, शिवली, मावळ), ११) सुजाता गोविंदराव रच्चेवार (तत्कालीन ग्राम महसूल अधिकारी, कुरवंडे, मावळ), ग्राम महसूल अधिकारी, वराडे, मावळ, १२) श्रीकांत कुलकर्णी (तत्कालीन लिपिक, मावळ), महसूल सहायक, तहसीलदार कार्यालय, पुणे शहर), १३ सुरेश सोपानराव जगताप (तत्कालीन मंडळ अधिकारी, खडकाळा), सहाय्यक महसूल अधिकारी, खनिकर्म शाखा, पुणे, १४ ज्ञानेश्वर सुदाम भराटे (तत्कालीन ग्राम महसूल अधिकारी, तळेगाव ढमढेरे), ग्राम महसूल अधिकारी, पाषाण (हवेली), १५ संजय पाटील (तत्कालीन तहसीलदार, दौंड), उपजिल्हाधिकारी (करमणूक कर), मुंबई शहर.

### महसूलचे घोटाळेबाज अधिकारी सक्तीच्या रजेवर

महसूल विभागात कार्यरत अधिकारी-कर्मचाऱ्यांनी संगनमताने आपल्या अधिकारांचा गैरवापर दीड ते दोन लाख गोरगरीब शेतकऱ्यांच्या जमिनी हडपल्याप्रकरणी संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत ही घोषणा केली.



### डिकसळच्या उपसरपंचपदी पूजा पोंदकुले बिनविरोध

**भिगवण, ता. २६ :** डिकसळ (ता. इंदापूर) ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी पूजा गोरख पोंदकुले यांची बिनविरोध निवड झाली. माजी उपसरपंच ज्ञानेश्वरी देविदास कुंभार यांनी राजीनामा दिल्याने पद रिक्त झाले होते. सोमवारी (ता. २३) उपसरपंच पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली. पोंदकुले यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून प्रतिभा देवकाते यांनी काम पाहिले, तर सरपंच मनीषा संदीप गवळी अध्यक्षस्थानी होत्या. निवडीनंतर गावातील अपंग नागरिकांना टेबल फॅनचे वाटप करण्यात आले. तसेच योगेश्वरी माता मंदिर येथे ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना उपसरपंच पूजा पोंदकुले यांनी गावाच्या विकासासाठी महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून विकासकामांना गती देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

# आमदार रोहित पवार आणि सुनील तटकरे यांच्यातील वाद चिघळला

**पुणे, ता. २६ :** राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवार यांच्या निधनानंतर सुरू झालेला सत्तासंघर्ष आता उघडपणे समोर येऊ लागला असून, आमदार रोहित पवार आणि अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यातील वाद तीव्र झाला आहे. रोहित पवार यांनी पक्ष ताब्यात घेण्याच्या हालचालींबाबत केलेल्या आरोपांना उत्तर देताना सुनील तटकरेंनी आक्रमक भूमिका घेत थेट इशाराच दिला.

पत्रकार परिषदेत बोलताना तटकरेंनी सांगितले की, अजितदादांच्या निधनानंतर रुग्णालयात आणि त्यानंतरच्या प्रक्रियेत काय घडले, याची सविस्तर माहिती आमच्याकडे आहे. त्यामुळे आरोप करण्याआधी जरा थांबा. त्यांनी सुनेत्रा पवार,



पार्थ पवार आणि जय पवार यांच्या विरोधात कटकारस्थान रचल्याचा आरोप फेटाळून लावत, उलट अशा प्रकारचे आरोप करणाऱ्यांवरच निशाणा साधला.

तटकरेंच्या मते, अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली घेतलेले निर्णय आणि पक्षाची सध्याची संघटनात्मक ताकद पाहता काही जणांना स्वतःच्या राजकीय अस्तित्वाची भीती वाटत आहे. वहिनी सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली आम्ही, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ आणि ४० आमदार एकत्र आहोत. संघटन मजबूत आहे, त्यामुळेच काही जण सतत प्रसिद्धीसाठी वक्तव्य करत आहेत, असा टोला त्यांनी लगावला.

रोहित पवार यांनी केलेल्या आरोपांमागे राजकीय हेतू असल्याचा दावा करत तटकरेंनी म्हटले की, आमच्या पक्षात डोकावण्यापेक्षा त्यांनी त्यांच्या पक्षात काय चाललंय ते पाहावं. याचबरोबर, शरद पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकींना अनुपस्थित राहणाऱ्या नेत्यांवरही त्यांनी अप्रत्यक्ष टीका केली. या वादामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत संघर्ष आणखी तीव्र झाल्याचे स्पष्ट होत आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेली नेतृत्वाची पोकळी, कुटुंबीयांची भूमिका आणि पक्षावरील नियंत्रण या मुद्द्यांवरून दोन गटांमध्ये उघड संघर्ष सुरू झाला आहे. आगामी काळात हा वाद आणखी वाढण्याची चिन्हे असून, त्याचा राज्याच्या राजकारणावरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# नोकरदाराचा विश्वास संपादन करून फसवणूक; ‘थार’ आणि ‘ग्लांझा’ कार घेऊन हप्ते थकवले

## शिरूर तालुक्यातील इसमाविरुद्ध सासवड पोलिसांत गुन्हा दाखल

**सासवड, ता. २६ :** सासवड येथील एका खाजगी नोकरी करणाऱ्या व्यक्तीचा विश्वास संपादन करून, त्यांच्या नावे दोन चारचाकी गाड्या व मोबाईल खरेदी करून ६ लाख १८ हजार १३३ रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी शिरूर तालुक्यातील एका इसमाविरुद्ध सासवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि घटना नोव्हेंबर २०२४ते २४ मार्च २०२५ या कालावधीत हा प्रकार घडला.

किशोर विठ्ठल शेट्टी (वय ४४, रा. सोळंकी कॉम्प्लेक्स, सासवड) असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. तर बाळासाहेब बबन टेम




गीरे (रा. पारोडी, ता. शिरूर) असे फसवणूक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी किशोर शेट्टी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार बाळासाहेब टेमगीरे याच्यावर सासवड पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी किशोर शेट्टी यांचा आरोपी बाळासाहेब टेमगीरे याने विश्वास संपादन केला. त्यानंतर किशोर शेट्टी यांच्या नावे महिंद्रा थार (क्र. MH १२ XH ९१०१) व टोयोटा ग्लांझा (क्र. MH १२ XX ६३५६) हि दोन वाहने खरेदी केली. आरोपीने ही दोन्ही वाहने आणि दोन मोबाईल स्वतःकडे वापरण्यास घेतले. या वाहनांचे मासिक हप्ते स्वतः भरण्याचे लेखी व तोंडी आश्वासन टेमगीरे याने दिले होते.

मात्र, कालांतराने त्याने हे हप्ते भरण्यास टाळाटाळ केली. इतकेच नव्हे, तर फिर्यादी शेट्टी यांच्याकडून वेळोवेळी ऑनलाईन स्वरूपात ६ लाख १८ हजार १३३ रुपये भरून घेतले आणि ते परत देण्यास नकार दिला. ठरल्याप्रमाणे या गाड्या स्वतःच्या नावावर करून घेण्यासाठी किशोर शेट्टी यांनी वारंवार मागणी केली. मात्र, आरोपीने गाड्या स्वतःच्या नावावर केल्या नाहीत आणि त्या फिर्यादीला परतही केल्या नाहीत. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच शेट्टी यांनी सासवड पोलीस ठाण्यात धाव घेतली.

दरम्यान, सासवड पोलिसांनी आरोपी बाळासाहेब टेमगीरे विरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३१६ (२) आणि ३१८ (४) नुसार फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस नाईक चव्हाण करत आहेत.

# डोर्लेवाडीत भक्तिमय वातावरणात श्रीराम जन्मोत्सव संपन्न

गोरख जाधव

डोर्लेवाडी, ता. २६ : रामनवमीच्या शुभमुहूर्तावर डोर्लेवाडी (ता. बारामती) येथील संत सावतमाळी मंदिरात श्रीराम जन्मोत्सव अत्यंत भक्तीभावाने आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. सियावररामचंद्रकीजयआणिपवनपुत्र हनुमान की जय अशा जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

उत्सवाचे औचित्य साधून मंदिराला आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. सकाळी ह.भ.प. बाळासो नाळे महाराज यांचे श्रीराम जन्मकथेवर आधारित भावपूर्ण कीर्तन झाले. रामायणातील प्रसंगांचे वर्णन ऐकताना उपस्थित भाविक भक्तिरसात न्हाऊन निघाले होते. दुपारी ठीक बारा वाजता श्रीरामाच्या जन्माचा शुभक्षण येताच मंदिरात गुलालाची उधळण




आणि पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी झालेल्या महाआरतीने वातावरणात चैतन्य निर्माण झाले. त्यानंतर महिलांनी पारंपरिक पाळणा गीते गाऊन प्रभू श्रीरामाचा पाळणा हलवला.

दरम्यान, मंदिरात दिवसभर श्री चैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या नामजपाचा कार्यक्रम दिवसभर सुरू होता. विविध भजनी मंडळांनी सादर केलेल्या भक्तिगीतांमुळे वातावरण अधिकच मंगलमय झाले. भाविकांसाठी डाळ, लाडू, मुरमुरे, रामफळ आणि महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या सोहळ्यासाठी डोर्लेवाडीसह परिसरातील हजारो भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

# लोणी काळभोर येथील ग्रामदैवत श्रीमंत अंबरनाथ यात्रेची धामधूम सुरू

## घटस्थापनेने धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ

**लोणी काळभोर, ता. २६ :** येथील ग्रामदैवत श्रीमंत अंबरनाथ यांच्या वार्षिक यात्रेनिमित्त धार्मिक सोहळ्यांची धामधूम सुरू झाली असून चैत्र नवरात्राच्या शुभ मुहूर्तावर आज सकाळी श्रींचा महामस्तकाभिषेक करण्यात आला. सायंकाळी पारंपरिक विधीनुसार घटस्थापना करून यात्रेच्या कार्यक्रमांना औपचारिक प्रारंभ करण्यात आला.

हनुमान जयंतीच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी साजऱ्या होणाऱ्या या यात्रेला लोणी काळभोरसह परिसरातील भाविकांचा मोठा उत्स्फुर्त प्रतिसाद असतो. यंदा गुरुवार (ता. २ एप्रिल) आणि शुक्रवारी (ता. ३ एप्रिल मुख्य यात्रा सोहळा पार पडणार आहे. गुढीपाडव्यापासूनच विविध



धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणात रंगले आहे.

या यात्रेचा मुख्य वैशिष्ट्यपूर्ण भाग म्हणजे श्रीमंत अंबरनाथ (काळभैरवनाथ) आणि माता जोगेश्वरी यांच्या पारंपरिक विवाह सोहळ्याची प्राचीन परंपरा. गुढीपाडव्याच्या दिवशी तांब्याच्या घागरींनी सजलेली कावड गणपती मंदिरातून महादेव मंदिर मार्गे अंबरनाथ मंदिरात नेण्यात आली. महादेव मंदिरात ग्रामस्थांनी पाडवा पूजन केले, तर सायंकाळी अंबरनाथ व जोगेश्वरी माता यांचा साखरपुडा विधी पार पडला. घटस्थापनेनंतर पाचव्या माळेला कावड सह्याद्रीच्या डोंगररांगांतील गवळेश्वर महादेव मंदिरात नेण्याची परंपरा आहे. तेथे लहानसा धार्मिक कार्यक्रम होतो. २९ मार्च रोजी घाणा भरणे व हळद फोडण्याचा कार्यक्रम होणार असून सातव्या माळेला अंबरनाथ व जोगेश्वरी यांना हळद लावण्याचा विधी पार पडणार आहे.

हनुमान जयंतीच्या पहाटे चार वाजता श्रींची महापूजा होऊन भाविकांकडून नैवेद्य अर्पण केला जातो. त्याच दिवशी रात्री छबिना, फटाक्यांची आतषबाजी आणि पारंपरिक तमाशाचा कार्यक्रम होणार आहे. ३ एप्रिल रोजी पहाटे अंबरनाथ व जोगेश्वरी यांचा विवाह सोहळा पार पडेल, तर दुपारी कुस्त्यांचा आखाडा रंगणार आहे. ४ एप्रिल रोजी रात्री वरात काढून विवाह सोहळ्याची सांगता करण्यात येणार आहे.

दरम्यान, शतकानुशतकांपासून चालत आलेली ही परंपरा ग्रामस्थ आजही मोठ्या श्रद्धा आणि भक्तिभावाने जपताना दिसतात. यात्रेच्या निमित्ताने गावात उत्सवी वातावरण निर्माण झाले असून भाविकांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळत आहे.

## संक्षिप्त

### पुण्यात महिलेला १ लाखांचा घातला गंडा

**पुणे, ता. २६ :** फोन करायचा आहे असे सांगून मोबाईल मागणाऱ्या ओळखीच्या व्यक्तीनेच महिलेची फसवणूक केल्याचा प्रकार मारुंजी परिसरात उघडकीस आला आहे. या प्रकरणात ५६ वर्षीय महिलेच्या खात्यातून सुमारे १ लाख रुपये काढण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गणेश विश्राम सोनवणे (रा. चाळीसगाव, जि. जळगाव) हा संबंधित महिलेच्या ओळखीचा होता. २१ नोव्हेंबर २०२५ ते २४ मार्च २०२६ या कालावधीत तो तिच्या घरी येत-जात होता. एके दिवशी त्याने फोन करण्याच्या कारणाने महिलेचा मोबाईल मागितला. ओळखीचा असल्याने महिलेने कोणताही संशय न घेता मोबाईल त्याला दिला. मोबाईल मिळाल्यानंतर आरोपीने त्यातील बँकिंग ॲपचा गैरवापर करून हळूहळू पैसे स्वतःच्या खात्यात वळवले. काही दिवसांतच त्याने एकूण १ लाख ८ हजार ५८४ रुपये ट्रान्सफर केल्याचे समोर आले. पैसे कमी झाल्याचे लक्षात येताच महिलेने तातडीने हिंजवडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी पोलिसांनी माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून आरोपीचा शोध सुरू आहे.

### ट्रकखाली झोपलेल्या तरुणाचा अपघातात मृत्यू

**पुणे, ता. २६ :** पुणे-नगर महामार्गावर शिरूर तालुक्यातील सरदवाडी परिसरात एक अतिशय धक्कादायक अपघात घडला आहे. सुरक्षित जागा समजून ट्रकखाली झोपलेल्या तरुणाचा पहाटे ट्रकचालकाने चिरडल्याने मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना राजस्थान ढाब्याच्या पार्किंगमध्ये घडली. योगेश आसाराम साठे (वय २९, रा. जालना) हा तरुण रात्री ट्रकखाली झोपला होता. पहाटेच्या सुमारास ट्रकचालकाने वाहन सुरू करून पुढे घेतले. मात्र, ट्रकखाली कोणी झोपले आहे याची त्याला कल्पना नव्हती. निष्काळजीपणे ट्रक पुढे नेल्यामुळे मागील चाक योगेश यांच्या अंगावरून गेले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेतील गंभीर बाब म्हणजे, अपघातानंतर चालकाने मदत करण्याऐवजी घटनास्थळावरून पळ काढला. त्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात ट्रकचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे रस्त्याच्या कडेला किंवा वाहनाखाली झोपण्याचा धोका पुन्हा समोर आला आहे. अशा प्रकारच्या निष्काळजीपणामुळे जीवाला मोठा धोका निर्माण होऊ शकतो, असे पोलिसांनी सांगितले आहे. पुढील तपास सुरू आहे.

### वाघोलीत कोयते बाळगणाऱ्या दोघांना बेड्या

**वाघोली, ता. २६ :** पुणे शहरात शस्त्र बाळगण्यास मनाई असतानाही बेकायदेशीरपणे कोयते बाळगणाऱ्या दोन तरुणांनागुन्हे शाखा युनिट ७ च्या पथकाने जेरबंद केले आहे. वाघेश्वर नगर आणि लोहगाव रोड परिसरात मंगळवारी (ता. २४) रात्री उशिरा या कारवाया करण्यात आल्या. यामध्ये एका १६ वर्षीय मुलासह २० वर्षीय तरुणाचा समावेश आहे. पहिली घटना मंगळवारी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास वाघेश्वर नगर येथील भैरवनाथ तलावाजवळ घडली. गायरान झोपडपट्टी परिसरात १६ वर्षीय अल्पवयीन लोखंडी कोयता बेकायदेशीरपणे जवळ बाळगताना मिळून आला. पोलिसांनी त्याच्याकडील कोयता जप्त केला असून, त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दुसऱ्या कारवाईत रात्री सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास लोहगाव रोडवरील शिवरकर वस्ती येथे एका पडक्या घरासमोर तुषार गोरख चांदणे (वय-२०, रा. मथुराईनगर, वाघोली) हा तरुण लोखंडी कोयता जवळ बाळगून असताना पोलिसांना सापडला. त्याच्याकडूनही ५०० रुपये किमतीचा कोयता जप्त करण्यात आला आहे.

# हॉटेल व्यवसायात अपहार करणारा 'मॅनेजर' गजाआड; बारामती शहर पोलिसांची कारवाई

**बारामती, ता. २६ :** हॉटेल व्यवसायात व्यवस्थापक म्हणून काम करताना मालकाचा विश्वासघात करून ३४ लाख रुपयांचा अपहार करून मागील सहा महिन्यांपासून फरार आरोपीला बारामती शहर पोलिसांनी अटक केली आहे. दत्तात्रय पोपटराव खुळे (रा. माळेगाव, ता. बारामती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. अशी माहिती बारामती शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी दत्तात्रय खुळे हा एका नामांकित हॉटेलमध्ये व्यवस्थापक म्हणून कार्यरत होता. या काळात त्याने ग्राहकांची बनावट



नावे नोंदवणे, उधारीचे खोटे हिशोब दाखवणे आणि आर्थिक व्यवहारात फेरफार करणे अशा पद्धतीचा अवलंब केला. या माध्यमातून

> गुन्हेगार कितीही चतुर असला, तरी तो कायद्याच्या कचाट्यातून सुटू शकत नाही, असा संदेश या कारवाईतून पोलिसांनी दिला आहे. अपहार झालेली रक्कम हस्तगत करण्यासाठी सध्या पोलीस कोठडीत आरोपीची अधिक चौकशी सुरू आहे. अशा प्रकारच्या आर्थिक फसवणुकीबाबत नागरिकांनी सतर्क राहून तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा,
> - **श्रीशैल चिवडशेट्टी,** वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बारामती शहर पोलीस ठाणे

त्याने एकूण ३४ लाख ३३ हजार ३९३ रुपयांचा मोठा अपहार केल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. याप्रकरणी बारामती शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाला होता.

गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी सातत्याने आपला ठावठिकाणा बदलून पोलिसांना गुंगारा देत होता. तपास पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय बातमीदारांच्या आधार घेतला. त्यनुसार आरोपी खुळे हा माळेगाव परिसरात येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळताच, पोलिसांनी सापळा रचून त्याला जेरबंद केले. ही यशस्वी कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चिवडशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक अशोक राऊत, सहायक फौजदार संदीप जाधव, हवालदार रामचंद्र शिंदे आणि पोलीस शिपाई अक्षय सिताफ यांनी हि कामगिरी केली.

### विजेच्या धक्क्याने कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्याचा मृत्यू

**पुणे, ता. २६ :** कृषी महाविद्यालयातील मेसमध्ये असलल्या जलशुद्धीकरण यंत्रातून विजेच्या धक्का बसल्याने एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली. विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्यानंतर दोषींवर कारवाई, तसेच सुरक्षाविषयक लेखापरीक्षण करण्याची मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे. चैतन्य कुंडलिक चव्हाण (वय -२३, रा. डोंगरगाव, ता. आष्टी, जि. बीड) असे मृत्युमुखी पडलेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. चैतन्य कृषी महाविद्यालयात शिक्षण घेत होता. ग्रीकल्चर बिझनेस मॅनजमेंट अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात तो होता. तो ई मेस समितीचा सदस्य होता. मेसचे कामकाज सुरळीत चालावे, यासाठी ही समिती काम करतो. १४ मार्च रोजी तो कृषी महाविद्यालयातील मेसचे कामकाज तो पाहत होता. त्या वेळी मेसमधील जलशुद्धीकरण यंत्राचे (फिल्टर) काम व्यवस्थित चालते का नाही, याची पाहणी तो करत होता.

# मुंढवा जमीन घोटाळ्यात दिग्विजय पाटील आणि शीतल तेजवानी दोषी

**पुणे, ता. २६ :** पुण्यातील मुंढवा कोरेगाव पार्क परिसरातील बहुचर्चित जमीन व्यवहार प्रकरणाने पुन्हा एकदा राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे. सुमारे ४० एकर मूळ महार वतनाची तब्बल १८०० कोटी रुपयांची जमीन केवळ ३०० कोटी रुपयांत खरेदी करण्यात आल्याचा आरोप या प्रकरणात आहे. या व्यवहारात खासदार पार्थ पवार, त्यांचे नातेवाईक दिग्विजय पाटील आणि मध्यस्थ शीतल तेजवानी यांची नावे चर्चेत आली आहेत.

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून करण्यात आली होती. या समितीचा तब्बल ४३९२ पानांचा अहवाल विधीमंडळात सादर करण्यात आला. अहवालानुसार, शीतल



तेजवानी, दिग्विजय पाटील यांच्यासह दोन महसूल अधिकाऱ्यांवर सब-रजिस्ट्रार रविंद्र तारू आणि तहसीलदार सुर्यकांत येवले यांच्यावर गंभीर ठपका ठेवण्यात आला आहे आणि त्यांच्यावर कारवाईची शिफारस करण्यात आली आहे. या व्यवहारात सरकारी जमीन बेकायदेशीर पद्धतीने हस्तांतरित करण्याचा प्रयत्न झाल्याचा निष्कर्ष समितीने काढला आहे. विशेषतः खरेदीचा दस्त नोंदवताना नियमांचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट झाले असून, महसूल आणि नोंदणी यंत्रणेतील अधिकाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची शिफारसही करण्यात आली आहे. दरम्यान, पार्थ पवार यांना यापूर्वी या व्यवहारात थेट सहभाग नसल्याचे सांगत काही प्रमाणात दिलासा देण्यात आला होता, कारण संबंधित दस्तऐवजांवर त्यांची सही आढळली नव्हती. मात्र, समितीने स्पष्ट केले आहे की, पुढील फौजदारी तपासात नवीन पुरावे किंवा इतर व्यक्तींचा सहभाग समोर आल्यास त्यांच्यावरही कारवाई करण्यात यावी. त्यामुळे या प्रकरणात त्यांच्यावरील संशय पूर्णपणे संपलेला नसल्याचे चित्र आहे. हा संपूर्ण प्रकार केवळ एका जमीन व्यवहारापुरता मर्यादित नसून, सरकारी जमिनींच्या व्यवस्थापनातील त्रुटी, भ्रष्टाचार आणि प्रशासनातील जबाबदारी या मुद्द्यांवर गंभीर प्रश्न निर्माण करणारा ठरतो. आगामी काळात या अहवालावर आधारित कारवाई कितपत प्रभावी होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### एकतर्फी प्रेमातून तरुणीचा छळ, एकाला अटक

**पुणे, ता. २६ :** पुण्यात एका तरुणीला त्रास देणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अटक केली असून या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. वारजे माळवाडी परिसरात घडलेल्या या प्रकारात २४ वर्षीय तरुणीचा पाठलाग करून तिच्याकडून मोठी रक्कम उकळण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. या प्रकरणी पोलिसांनी विजयसिंह संतोष गुंड (वय ३०) याला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हा प्रकार २५ डिसेंबर २०२५ पासून सुरू झाला होता. आरोपी काही महिन्यांपासून संबंधित तरुणीचा सतत पाठलाग करत होता. तो तिला वेगवेगळ्या ठिकाणी अडवून २० लाख रुपयांची मागणी करत होता. पैसे न दिल्यास तिचे खाजगी फोटो सोशल मीडियावर टाकण्याची धमकीही त्याने दिली होती.

तरुणीने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपीने तिचे काही आक्षेपार्ह फोटो सोशल मीडियावर प्रसारित केले. यामुळे तरुणीची बदनामी झाली आणि ती मानसिक तणावाखाली आली. अखेर धीर करून तिने वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

तक्रार मिळताच पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. तांत्रिक तपास आणि माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेण्यात आला आणि त्याला अटक करण्यात आली. गेल्या काही महिन्यांपासून तो तरुणीला त्रास देत असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. या घटनेनंतर नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत असून पोलिसांनी महिलांनी अशा प्रकारांबाबत त्वरित तक्रार करावी, असे आवाहन केले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# गौरी वांजळे प्रकरणात तातडीच्या अटकेची मागणी; बोगस वकील असल्याचा आरोप

**पुणे, ता. २६ :** गौरी वांजळे उर्फ गौरी बाजारे ही स्वतःला वकील म्हणून सांगत असली तरी ती प्रत्यक्षात बोगस असल्याचा आमचा आरोप आहे. मागील चार-पाच वर्षांत तिने अनेक नागरिकांना गंडा घातल्याच्या तक्रारी आमच्याकडे आल्या आहेत, काही लोकांना प्रेमाच्या जाळ्यात अडकवून त्यांच्यावर दबाव टाकणे, गुंगीचे औषध देऊन गैरफायदा घेणे आणि नंतर ब्लॅकमेल करणे अशा प्रकारांच्या तक्रारीही समोर आल्या आहेत. तसेच निरपराध नागरिकांना खोट्या गुन्ह्यांत अडकवले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर संबंधित महिलेला त्वरित अटक करण्यात यावी, अशी रणरागिणी विचार मंचाच्या अध्यक्षा उज्वला गौड यांनी केली आहे.

दरम्यान, पुणे शहरात चर्चेत आलेल्या या प्रकरणात विविध




गुन्ह्यांच्या आरोपांनंतरही अद्याप अटक न झाल्याने तक्रारदारांनी कोथरूड पोलिसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या प्रकरणामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, तातडीने कारवाईची मागणी जोर धरत आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, संबंधित महिलेविरुद्ध यापूर्वी गुन्हे दाखल झाले असून न्यायालयाने तिचा जामीन अर्ज फेटाळल्याची माहिती समोर आली आहे. तरीदेखील ती अद्याप पोलिसांच्या ताब्यात नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. ग्रामीण भागात वेगवेगळ्या नावांचा वापर करून सामान्य नागरिकांवर खोटे गुन्हे दाखल करण्याचा आणि त्यांना त्रास देण्याचा प्रयत्न केल्याचे आरोप काही तक्रारदारांनी केले आहेत. या प्रकरणात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (अॅट्रॉसिटी) गुन्हे दाखल असल्याचेही सांगण्यात येत आहे. काही पीडितांनी संबंधित महिलेवर फसवणूक, धमकी व ब्लॅकमेलिंगचे आरोप करत पोलिसांकडे लेखी तक्रारी दिल्याचा दावा केला आहे. मात्र, अद्याप ठोस कारवाई न झाल्यामुळे संताप व्यक्त करत तिला तातडीने अटक करण्याची मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, या सर्व आरोपांबाबत पोलिसांकडून अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नसून, प्रकरणाचा तपास सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले. संबंधित महिलेची बाजू समोर आलेली नसल्याने सत्यस्थिती तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

# अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळांचा ट्रान्सजेंडर व्यक्तीसोबतचा व्हिडीओ व्हायरल

**पुणे, ता. २६ :** राज्यातील राजकारणात एका कथित व्हिडिओमुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्याशी संबंधित असल्याचा दावा करण्यात येत असलेला एक आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यावरून राजकीय आणि सामाजिक पातळीवर चर्चा सुरू झाली आहे.

माध्यमांमध्ये आलेल्या माहितीनुसार, हा व्हिडिओ एका ट्रान्सजेंडर व्यक्तीसोबत असल्याचा दावा केला जात आहे. संबंधित व्यक्ती पवन यादव असल्याचे सांगितले जात असून, हा व्हिडिओ त्याच्या नातेवाईकांकडून सार्वजनिक करण्यात आल्याची चर्चा आहे. मात्र, या व्हिडिओची अधिकृत पुष्टी अद्याप



झालेली नाही, त्यामुळे त्याच्या सत्यतेबाबत अनिश्चितता कायम आहे. या प्रकरणामुळे शासकीय निवासस्थानांच्या वापराबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. काही स्तरांतून सरकारी सुविधांचा गैरवापर झाल्याचे आरोप करण्यात येत असून, या संपूर्ण घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, पवन यादव याच्याविरोधात यापूर्वी मुंबईतील कुरार पोलीस ठाण्यात दमदाटी आणि खंडणीप्रकरणी गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणाला आणखी वेगळे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या मुद्द्यावर प्रतिक्रिया देताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नैतिकतेचा प्रश्न उपस्थित करत सरकारवर टीका केली आहे. त्यांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली आहे.

सध्या या प्रकरणात अधिकृत भूमिका किंवा स्पष्टीकरण समोर आलेले नसल्याने, तथ्य आणि अफवा यामधील सीमारेषा अस्पष्ट आहे. त्यामुळे तपास यंत्रणांकडून सत्य समोर येणे आणि वस्तुस्थिती स्पष्ट होणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

# नमो शेतकरी योजनेचा ८वा हप्ता वितरित; शेतकऱ्यांना १७९८ कोटींचा मिळाला लाभ

**पुणे,ता. २६ :** राज्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेत राज्य सरकारने नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा आठवा हप्ता वितरित केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तब्बल १७९८.७८ कोटी रुपये थेट लाभ हस्तांतरणाद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले. या हप्त्याचा लाभ राज्यातील सुमारे ८९,७५,२९८ शेतकरी कुटुंबांना झाला आहे.




ही योजना केंद्र सरकारच्या प्रधान मंत्री किसान सम्मान निधी योजनेच्या धर्तीवर राबवली जात आहे. केंद्र सरकारकडून दरवर्षी ६००० रुपये दिले जातात, त्यात राज्य सरकारकडून आणखी ६००० रुपयांची भर घालून शेतकऱ्यांना एकूण १२००० रुपयांची वार्षिक आर्थिक मदत मिळते. यामुळे लहान आणि मध्यम शेतकऱ्यांना थेट आर्थिक आधार मिळण्यास मदत होते. मुंबईतील विधान भवन येथे झालेल्या कार्यक्रमात या हप्त्याचे वितरण करण्यात आले. या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील शेतीवर वाढते खर्च, बदलते हवामान आणि बाजारातील अनिश्चितता या पार्श्वभूमीवर अशी थेट आर्थिक मदत महत्त्वाची मानली जाते. बियाणे, खते, औषधे आणि इतर खर्च भागवण्यासाठी हा निधी उपयोगी पडतो. विशेषतः लहान शेतकऱ्यांसाठी ही रक्कम हंगामाच्या सुरुवातीला मोठा आधार ठरते.

दरम्यान, प्रशासनाकडून शेतकऱ्यांना आपापल्या बँक खात्याची पडताळणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. काही तांत्रिक अडचणीमुळे हप्ता न मिळाल्यास संबंधित कृषी कार्यालयाशी संपर्क साधण्यास सांगण्यात आले आहे.

एकीकडे सरकारकडून थेट आर्थिक मदत दिली जात असली, तरी दीर्घकालीन उपाय म्हणून शेतीला स्थिर बाजारभाव, सिंचन सुविधा आणि उत्पादन खर्च नियंत्रण यावर अधिक लक्ष देणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

# शिरूरचे राजेंद्र जासूद यांनी केला भोंदू अशोक खरात बाबाविरुद्ध फसवणूकीचा गुन्हा

**योगेश मारणे**

न्हावरे, ता. २६ : नाशिक मध्ये स्वतःला चमत्कारिक शक्ती असल्याचा दावा करणाऱ्या खरात या भोंदू बाबाच्या करामतींचा पुन्हा एकदा पर्दाफाश झाला असून,अशोक खरात याच्याविरुद्ध सरकारवाडा पोलीस ठाण्यात आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.यामुळे खरातविरोधातील एकूण गुन्ह्यांची संख्या आता १० वर पोहोचली आहे.त्यामध्ये थेट अशोक खरातविरुद्ध ८ आणि त्याच्याशी संबंधित २ गुन्ह्यांचा समावेश आहे.

या नव्या प्रकरणात शिरूर पंचायत समितीचे माजी उपसभापती व व्यावसायिक राजेंद्र जासूद यांनी फिर्याद दिली आहे. मृत्यूची भीती दाखवून आर्थिक फसवणूक आणि खंडणी उकळल्याचा गंभीर आरोप जासूद यांनी केला आहे.

तक्रारीनुसार, लॉजेस्टिक व्यवसायात यश मिळवण्यासाठी अवतार पूजा करण्याचा सल्ला देत अशोक खरात याने राजेंद्र जासूद यांना जाळ्यात ओढले.पूजेपूर्वी परिसाची शक्ती मिळवण्यासाठी २१ देशांची भ्रमंती करावी लागेल, अन्यथा नागदेवतेचा कोप होऊन मृत्यू होईल,अशी भीती दाखवण्यात आली.

या भीतीपोटी राजेंद्र जासूद यांनी २०१८ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत वेळोवेळी मोठ्या रकमा खर्च केल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. अमेरिकेत वैद्यकीय



उपचारासाठी सुमारे २९ लाख ८१ हजार रुपये खर्च करण्यासही त्यांना भाग पाडण्यात आले, असल्याचे जासूद यांनी फिर्यादीमध्ये म्हटले आहे.

अवतार पूजेसाठी २०१८ मध्ये MH-15-GL-8181 क्रमांकाची मर्सिडीज कार भेट दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. तसेच युगांडा, इजिप्त, आयर्लंड, श्रीलंका, कंबोडिया, बांगलादेश यांसह अनेक देशांच्या दौऱ्यांवर नेण्यात आले. यापूर्वी म्यानमार व ग्रीनलँड दौऱ्यांचाही समावेश आहे. ग्रीनलँडमध्ये हे स्वर्गाचे दुसरे टोक आहे असा दावा करत हॉटेलमध्ये फरशीवर झोपून धार्मिक विधीचा देखावा केल्याचाही आरोप राजेंद्र जासूद यांच्याकडून करण्यात आला आहे.

१ ऑक्टोबर २०१८ रोजी रात्री इशान्येश्वर मंदिराच्या मागील बाजूस नेऊन महादेव नागाच्या रूपात दर्शन देतील असे सांगत बनावट नाग दाखवून भीती निर्माण केली. त्यानंतर पुढील पाच वर्षांत २१ देशांची यात्रा करण्याचा सल्ला देत आणखी पैसे उकळण्यात आल्याचा आरोप जासूद यांनी केला आहे.

मिरगाव येथील फार्महाऊस बांधकामासाठी १ कोटी ११ लाख रुपये, तुर्कस्थानमधील लाकूड व लोखंडी फर्निचरसाठी ४९ लाख रुपये, सागवानी फर्निचरसाठी २९ लाख रुपये आणि किचनसाठी ४२ लाख ५० हजार रुपये अशा विविध कारणांखाली मोठ्या प्रमाणावर रक्कम उकळण्यात आल्याचे फिर्यादीमध्ये समोर आले आहे.

दरम्यान, आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर जासूद यांनी भोंदू खरात बाबाला पैसे परत मागितले असता, अशोक खरात यानेच वावी पोलीस ठाण्यात राजेंद्र जासूद व दिनेश परब यांच्या विरोधात ५ कोटींची खंडणी मागितल्याचा खोटा गुन्हा दाखल केल्याचा आरोप राजेंद्र जासूद यांनी केला आहे.

# कमानीवर झेंडा लावताना तरुण ‘हाय व्होल्टेज’ तारेला चिटकला




**सोलापूर, ता. २६ :** सोलापूर शहरातील गजबजलेल्या कुमठा नाका परिसरात एक हृदयद्रावक अपघात घडला असून, एका २४ वर्षांच्या तरुणाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला आहे. केतन रमेश पाटोळे, भारतनगर येथील रहिवासी, हा स्वागतनगर रोडवरील एका कार्यक्रमाच्या तयारीदरम्यान झालेल्या अपघातात जागीच मरण पावला. एका क्षणात घडलेल्या या घटनेने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

घटनेमागील कारण समजून घेतले, तर हा अपघात निष्काळजीपणा आणि सुरक्षेच्या अभावाचे गंभीर उदाहरण ठरतो. गुरुवारी होणाऱ्या स्थानिक कार्यक्रमासाठी यशवंत सोसायटी परिसरात मंडप उभारण्यात आला होता. त्यासमोर सुमारे २० ते २५ फुट उंच स्वागत कमान उभारली होती. या कमानीवर भगवा झेंडा लावण्याचे काम सुरू असताना केतन वर चढला होता. झेंड्यासाठी वापरलेल्या कापडाला स्टीलचा पाइप जोडलेला होता. आणि याच पाइपमुळे जीवघेणा धोका निर्माण झाला.

कमानीच्या अगदी शेजारी उच्च दाबाची वीजवाहिनी होती. झेंडा लावताना स्टीलचा पाइप त्या तारेला स्पर्श झाला आणि क्षणार्धात प्रचंड विजेचा धक्का बसला. धक्क्याच्या तीव्रतेमुळे केतन थेट २० फुट उंचीवरून खाली कोसळला. उपस्थित लोकांसाठी हा प्रसंग इतका अचानक आणि भीषण होता की काही क्षण काय घडले, हेच कुणाला समजले नाही.

केतनला तातडीने शासकीय रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. घरातील कर्ता तरुण गमावल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आईला ही बातमी सहन न झाल्याने तिची शुद्ध हरपली, तर रुग्णालयात मित्र-नातेवाइकांचा आक्रोश पाहायला मिळाला.

# पुणे महानगर क्षेत्राच्या विकासासाठी ग्रोथ हब प्लॅनला गती



**पिंपरी-चिंचवड, ता. २६ :** पुणे महानगर क्षेत्र अर्थात पीएमआर ग्रोथ हब प्लॅन अंतर्गत मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होणार आहे. निती आयोगाकडून सुमारे ४० हजार कोटी रुपयांच्या निधीला मान्यता मिळाली आहे. या योजनेमुळे पुणे महानगर क्षेत्राच्या विकासाला मोठी चालना मिळेल, असे आश्वासन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सभागृहात दिले.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या समरोपाच्या दिवशी पुणे मेट्रोपोलिटन रिजनच्या सर्वांगीण विकासाचा मुद्दा जोरकसपणे मांडत आमदार महेश लांडगे यांनी राज्य शासनाचे लक्ष वेधले. पुणे महानगर क्षेत्र हे राज्याच्या आर्थिक विकासाचे प्रमुख केंद्र असून, त्यासाठी दीर्घकालीन आणि शाश्वत नियोजनाची आवश्यकता असल्याची मागणी सभागृहात केली.

आमदार लांडगे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पीएमआर क्षेत्रात मेट्रो विस्तार, रिंगरोड, मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब, नदी संवर्धन आणि औद्योगिक सुविधा यांसारख्या विविध प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रगती होत असल्याचे त्यांनी नमूद केले. पीएमआरडीए, महा मेट्रो, पीएमपीएमएल आदी यंत्रणा समन्वयाने काम करत असून शहरी व ग्रामीण भागात नागरी सुविधा उभारल्या जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

मात्र, हा विकास अधिक परिणामकारक व शाश्वत होण्यासाठी काही महत्त्वाच्या मागण्या आमदार लांडगे यांनी सभागृहात मांडल्या. यामध्ये मेट्रो व रिंगरोड प्रकल्पांची कालबद्ध अंमलबजावणी, नदी प्रदूषण नियंत्रण आणि सांडपाणी व्यवस्थापनाची क्षमता वाढवणे, अनियोजित विकासावर नियंत्रण ठेवत एकात्मिक विकास आराखडा तयार करणे, एमआयडीसी क्षेत्रातील सुविधा सुधारणे, तसेच महावितरणवरील ताण कमी करण्यासाठी पर्यायी ऊर्जा प्रकल्पांना चालना देणे यांचा समावेश होता.

## धार्मिक स्थळांची ओळख कायम रहावी

तसेच, पिंपरी-चिंचवड शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता नवीन जलस्त्रोत निर्माण करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. यासोबतच श्रीक्षेत्र देहू, आळंदी, भीमाशंकर आणि वढू तुळापूर या धार्मिक व ऐतिहासिक स्थळांसाठी स्वतंत्र विकास आराखडा तयार करावा. त्यांना पर्यटन स्थळ नव्हे, तर धार्मिक स्थळ म्हणून त्यांची ओळख कायम राहील, असे संबोधित करावे, अशी मागणीही त्यांनी केली. पी एम आर क्षेत्राचा विकास केवळ वेगवान नव्हे तर शाश्वत, नियोजनबद्ध आणि सर्वसमावेशक व्हावा, यासाठी शासनाने ठोस व कालबद्ध कृती आराखडा राबवावा, अशी आग्रही भूमिका आमदार महेश लांडगे यांनी सभागृहात मांडली.

# पुण्यातील सहकारनगरमधील अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला अटक




**पुणे, ता. २६ :** पुण्यातील सहकारनगर परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. सोशल मीडियाचा गैरफायदा घेऊन एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला जाळ्यात ओढणाऱ्या आणि तिच्यावर अत्याचार करणाऱ्या नराधमाला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या नराधमाने मुलीला ‘कुत्रा दाखवण्याच्या’ बहाण्याने घरी बोलावून तिचे आयुष्य उद्ध्वस्त केले असून, पीडित मुलगी आता १० आठवड्यांची गर्भवती असल्याचे उघड झाले आहे.


सहकारनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव प्रथमेश ज्ञानेश्वर राऊत (वय २३, रा. धनकवडी, पुणे) असे आहे. या प्रकरणातील पीडित मुलगी अवघ्या १६ वर्षांची आहे. आरोपी प्रथमेशने ‘इन्स्टाग्राम’ या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून या मुलीशी ओळख वाढवली होती. संवादातून मैत्री वाढल्यानंतर, नोव्हेंबर २०२५ मध्ये त्याने माझ्या घरी नवीन कुत्रा आणला आहे, तो बघायला ये, असे सांगून तिला आपल्या घरी बोलावले.

मुलगी घरी आल्यानंतर, तिने विरोध करूनही आरोपीने तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. मी तुझ्याशी लग्न करणार आहे, हे सगळं आजकाल कॉमन आहे, असे सांगून त्याने तिची दिशाभूल केली आणि वारंवार तिचे लैंगिक शोषण केले. हा प्रकार नोव्हेंबर २०२५ते ३ जानेवारी २०२६ या दरम्यान सातत्याने सुरू होता.

काही दिवसांपूर्वी पीडित मुलीला सतत उलट्या आणि मळमळीचा त्रास होऊ लागला. घरच्यांनी तिला डॉक्टरांकडे नेले असता, तिची सोनोग्राफी करण्यात आली. तेव्हा ती १० आठवड्यांची गर्भवती असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. हे ऐकून पालकांना मोठा धक्का बसला. पीडितेने घडलेला सर्व प्रकार सांगितल्यानंतर कुटुंबीयांनी सहकारनगर पोलीस ठाण्यात धाव घेतली.

सहकारनगर पोलिसांनी आरोपी प्रथमेश राऊत विरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून त्याला तातडीने अटक केली आहे. पोलीस उपनिरीक्षक काळे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीरच्या पाठीशी पवार; प्रशिक्षणासाठी १२ लाखांचा दिलासा



**मुंबई, ता. २६ :** डबल महाराष्ट्र केसरी किताब जिंकणारा कुस्तीपटू हर्षवर्धन सदगीर याने अलीकडेच ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीत पवार यांनी त्याला कुस्ती सोडू नये, तसेच गुरु काकासाहेब पवार यांच्या तालमीत नियमित सराव करावा, असा सल्ला दिला. यावर सदगीर याने सकारात्मक प्रतिसाद देत पुन्हा नव्या जोमाने खेळ सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

काही दिवसांपूर्वी भावनेच्या भरात कुस्ती सोडण्याची भूमिका त्याने मांडली होती. मात्र, त्यानंतर क्रीडा क्षेत्रातून आणि विविध स्तरातून त्याला मोठे पाठबळ मिळाले. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनीही त्याला प्रोत्साहन देत १२ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. ही मदत त्याच्या पुढील सराव, आहार, फिटनेस आणि स्पर्धात्मक तयारीसाठी उपयोगी ठरणार आहे.

या मदतीमुळे हर्षवर्धन सदगीर याचा आत्मविश्वास वाढला असून, आंतरराष्ट्रीय स्तरावर चांगली कामगिरी करण्यासाठी तो अधिक सज्ज होणार आहे. ग्रामीण भागातून कठीण परिस्थितीतून पुढे आलेल्या या खेळाडूचा प्रवास अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

वाघोली येथे पार पडलेल्या ६८ व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत दुहेरी किताब पटकावत सदगीर याने दमदार पुनरागमन केले होते. आर्थिक अडचणी आणि नोकरीच्या शोधात असतानाही त्याने मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर यश मिळवले आहे. योग्य मार्गदर्शन आणि पाठबळ मिळाल्यास तो पुढे देशासाठी मोठे यश मिळवू शकतो, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. ‘पुणे प्राईम न्यूज’ मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे ‘पुणे प्राईम न्यूज नेटवर्क’चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

पुणे प्राईम न्यूज

http://www.puneprimenews.com

प्राईम लाईफ



## फ्लॉवरमधील किड काढण्यासाठी कोणत्या टिप्स वापरायला हव्यात

बाजारात आता मोठ्या प्रमाणात फ्लॉवरची भाजी दिसून येत आहे. परंतु अनेकजण फ्लॉवर खाण्यास नाक मुरडतात. कारण फ्लॉवरमध्ये असणारे किडे साफ करणं एक डोकेदुखी असते. फ्लॉवरपासून आपण विविध पदार्थ बनवू शकतो. पराठ्यांपासून ते भजीपर्यंत आपण विविध पदार्थ फ्लॉवरपासून बनवून खाऊ शकतो. फ्लॉवर हा आपल्या जिभेच्या चवीसाठी उत्तम आहेच. शिवाय आपल्या आरोग्यासाठी सुद्धा फ्लॉवर फार उपयुक्त मानला जातो.

फ्लॉवरमध्ये व्हिटॅमिन सी, केआणि फोलेट असते. तसेच फायबरचा उत्तम स्त्रोत फायबरमध्ये असतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, कमी कॅलरीजमुळे फ्लॉवर वजन कमी करण्यासाठीही उत्तम मानला जातो. फ्लॉवरमध्ये लपलेले किडे खूप धोकादायक असतात. म्हणून फ्लॉवर ची भाजी करण्याआधी तो नीट स्वच्छ करणे गरजेचे असते.

फ्लॉवर धुण्यासाठी प्रथम, एक मोठे भांडे घ्या आणि ते पाण्याने भरा. लिंबाच्या रसात बेकिंग सोडा मिसळा. नंतर, या पाण्यात फुलकोबी घाला आणि १० मिनिटे तसेच राहू द्या. यामुळे सर्व कीटक निघून जातील आणि फ्लॉवरआतून स्वच्छ होईल.

फ्लॉवर स्वच्छ करण्याची ही पद्धत सर्वात सोपी आणि प्रभावी आहे. यासाठी, एका मोठ्या भांड्यात पाणी घ्या आणि त्यात मीठ घाला. त्यात फ्लॉवर घालावा. ५-७ मिनिटे तसेच ठेवा आणि नंतर सामान्य पाण्याने स्वच्छ धुवा. मीठाचे पाणी देखील कीड काढून टाकते.

फ्लॉवर स्वच्छ करण्यासाठी आणि त्यातील किड काढून टाकण्यासाठी व्हिनेगरचा वापरही तितकाच गरजेचा ठरतो. याकरता एक मोठे भांडे पाण्याने भरा आणि १ चमचा व्हिनेगर घाला. त्यात फ्लॉवर बुडवावा, त्यानंतर २-३ मिनिटांनी, ते पाणी काढून टाकावे आणि स्वच्छ पाण्याने स्वच्छ धुवा. व्हिनेगरमध्ये आम्लयुक्त गुणधर्म असतात, यामुळे फ्लॉवरमधील किडे बाहेर येण्यास मदत होते.

फ्लॉवर गरम पाण्यात उकळून देखील स्वच्छ करू शकता. हे करण्यासाठी, एका भांड्यात पाणी उकळवा आणि उकळत्या पाण्यात फ्लॉवर घालावा. काही सेकंदातच फ्लॉवरमधील किड बाहेर येईल. उकळत्या पाण्यात मीठ देखील घालू शकता.

# गरिबांचा फ्रीज पुन्हा बाजारात; उन्हाळ्याच्या झळांनी माठांची मागणी वाढली

**लोणी काळभोर, ता. २६ :** मार्चच्या अखेरीसच उन्हाची तीव्रता वाढू लागल्याने पूर्व हवेली परिसरात पाण्यासाठी पारंपरिक आणि स्वस्त पर्याय म्हणून ओळखला जाणारा माठ पुन्हा बाजारात मोठ्या प्रमाणावर दाखल झाला आहे. ग्रामीण भागापासून शहरातील झोपडपट्ट्या आणि मध्यमवर्गीय वस्त्यांपर्यंत गरिबांचा फ्रीज म्हणून ओळख असलेल्या माठाला यंदाही नागरिकांची पसंती मिळताना दिसत आहे.



उन्हाळ्यात थंड, नैसर्गिक आणि आरोग्यदायी पाणी देणारा माठ हा अनेक कुटुंबांसाठी अजूनही अत्यावश्यक वस्तू मानला जातो. विजेवर अवलंबून असलेल्या फ्रिजच्या तुलनेत माठातले पाणी नैसर्गिकरीत्या थंड होते आणि त्यासाठी अतिरिक्त खर्चही करावा लागत नाही. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी माठ हा आजही सर्वात किफायतशीर पर्याय ठरतो.

यावर्षी मात्र माठांच्या किंमतीत ५० ते १०० रुपयांची वाढ झाल्याचे बाजारात दिसून येत आहे. मागील वर्षी २०० रुपयांना मिळणारा साधा माठ यंदा २५० रुपयांपर्यंत पोहोचला आहे, तर ३०० रुपयांचा मोठा माठ ३५० ते ४०० रुपयांना विक्री होत आहे. या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावर ताण पडत असला, तरीही उन्हाच्या कडकडीत झळांमुळे नागरिक माठ खरेदी करण्यास मागे हटत नाहीत.


लोणी काळभोर, थेऊर, कुंजीरवाडी आणि उरुळी कांचन परिसरातील आठवडे बाजारात सध्या माठांची विक्री जोरात सुरू आहे. बाजारात विविध आकारांचे आणि नक्षीदार माठ ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. काही विक्रेते हातगाडीवरून घराघरांत जाऊन माठ विक्री करत असल्याने नागरिकांनाही सोयीस्करपणे खरेदी करता येत आहे. ग्रामीण भागात माठाला डेरा या नावानेही ओळखले जाते.

कुंभार व्यवसायावर परिणाम पूर्वी गावोगावी कुंभार स्वतः माठ तयार करून थेट विक्री करत असत. मात्र सध्या अनेक कुंभार व्यावसायिक स्वतः माठ तयार करण्याऐवजी इतर ठिकाणांहून तयार माठ खरेदी करून विक्री करण्यास प्राधान्य देताना दिसत आहेत. कच्चा माल, मजुरी आणि वाहतूक खर्च वाढल्यामुळे स्थानिक स्तरावर माठ तयार करणे त्यांना परवडत नसल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. यामुळे पारंपरिक कुंभार व्यवसायावरही परिणाम होत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

> माठ बनविणे हा आमचा पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेला पारंपरिक व्यवसाय आहे. मात्र सध्या माठ तयार करण्यासाठी लागणारी माती आणि इतर साहित्य सहज उपलब्ध होत नाही. बाहेरून कच्चा माल आणायचा झाला, तर त्याचा खर्च खूप वाढतो आणि तयार केलेला माठ विकूनही तो खर्च निघेलच याची खात्री राहत नाही. त्यामुळे सध्या आम्ही तयार माठ बाहेरून आणूनच विक्री करत आहोत. या विक्रीतून घरचा उदरनिर्वाह आणि आर्थिक घडी काही प्रमाणात सावरायला मदत होत आहे.
> - **सोपान तुकाराम कुंभार,** (विक्रेता, लोणी काळभोर, ता. हवेली)

# अशोक खरात प्रकरणातील पीडितांचे व्हिडिओ शेअर केल्यास थेट तुरुंगवास!

**पुणे, ता. २६ :** नाशिकमधील अशोक खरात प्रकरणात पोलिसांनी कारवाईचा वेग वाढवत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या प्रकरणात पीडित महिलांचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असल्याने आता ते शेअर करणाऱ्यांवर थेट अटकेची कारवाई केली जाणार असल्याचा स्पष्ट इशारा विशेष तपास पथकाने दिला आहे.



या प्रकरणात आधीच काही व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर समाजात तीव्र संताप व्यक्त झाला होता. पीडितांच्या गोपनीयतेचा भंग होत असल्याने कारवाईची मागणीही वाढत होती. त्यानंतर अहिल्यानगर पोलिसांनी व्हिडिओ शेअर केल्याप्रकरणी तिघांविरोधात गुन्हे दाखल केले. आता या कारवाईला अधिक कडक रूप देत, पुढे असे प्रकार आढळल्यास संबंधित व्यक्तींना थेट अटक केली जाईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

विशेष तपास पथकाने सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर, न्यूज चॅनल्स आणि डिजिटल पोर्टल्सना पत्र पाठवून याबाबत स्पष्ट सूचना दिल्या आहेत. पीडित महिलांचे अश्लील किंवा संवेदनशील व्हिडिओ शेअर करणे हे केवळ बेकायदेशीरच नाही, तर त्यांच्या सन्मान आणि सुरक्षिततेवर घाला घालणारे आहे, असेही या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

महत्त्वाचे म्हणजे, केवळ व्हिडिओ पोस्ट करणाऱ्यांवरच नव्हे, तर ते फॉरवर्ड करणारे किंवा संबंधित ग्रुपचे अ‍ॅडमिन यांच्यावरही गुन्हे दाखल होणार आहेत. माहिती तंत्रज्ञान कायदा आणि अन्य संबंधित कलमांनुसार कठोर कारवाई केली जाणार आहे.


या निर्णयामागे पोलिसांचा स्पष्ट उद्देश आहे. पीडितांचे संरक्षण आणि त्यांच्या गोपनीयतेचे जतन. अशा प्रकारचे व्हिडिओ शेअर केल्याने केवळ गुन्हेगारांनाच मदत होते, तर पीडित महिलांवर दुहेरी अन्याय होतो. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सोशल मीडियावर कोणतीही संवेदनशील सामग्री शेअर करण्यापूर्वी काळजी घेणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, कायद्याचा फास थेट त्यांच्या गळ्यातही येऊ शकतो, असा स्पष्ट संदेश पोलिसांनी दिला आहे.

## ताथवडे येथे भररस्त्यात पोलिसावर हल्ला, आरोपीला अटक

**पिंपरी-चिंचवड, ता. २४ :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात पोलिसांवरील हल्ल्यांच्या घटना वाढत असून ताथवडे येथे अशीच एक धक्कादायक घटना घडली आहे. मंगळवारी सायंकाळी कर्तव्य बजावत असलेल्या वाहतूक पोलिसावर एका व्यक्तीने कात्रीने हल्ला केल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अब्दुल मोहम्मद अन्सारी (वय ४२) हे वाहतूक पोलीस ताथवडे अंडरपास परिसरात सायंकाळी सुमारे ७ वाजता वाहतूक नियमन करत होते. याच वेळी हर्षल सुपेकर नावाच्या संशयिताने अचानक त्यांच्या जवळ येत कात्रीने हल्ला केला. या हल्ल्यात अन्सारी जखमी झाले. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. जखमी अवस्थेत असलेल्या अन्सारी यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

प्राथमिक तपासात असे समोर आले आहे की, काही दिवसांपूर्वी वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपीवर कारवाई केली होती. त्याचाच राग मनात ठेवून हा हल्ला केल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. घटनेनंतर वाकड पोलीस ठाण्याने तातडीने तपास सुरू केला असून आरोपीच्या वडिलांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. मुख्य आरोपीचा शोध सुरू आहे.

या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रुग्णालयात भेट देऊन जखमी पोलिसाची विचारपूस केली. भररस्त्यात पोलिसावर झालेल्या या हल्ल्यामुळे सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे.




## मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर वाहनांच्या रांगाच रांगा

**पुणे, ता. २६ :** रामनवमीच्या निमित्ताने गुरुवारी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. विशेषतः लोणावळा आणि घाट परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. काही ठिकाणी ही रांग सुमारे ४ ते ५ किलोमीटरपर्यंत पसरली होती, त्यामुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला.

मिळालेल्या माहितीनुसार, सुट्टी आणि लाँग वीकेंडमुळे मोठ्या प्रमाणात पर्यटक बाहेर पडल्याने वाहनांची संख्या अचानक वाढली. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक मंदावून काही वेळेस जवळजवळ ठप्प झाली होती. बराच वेळ वाहनं अडकून पडल्याने काही प्रवासी गाड्यांमधून उतरून रस्त्यावरच थांबलेले दिसले.

वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलीस प्रशासनाने महत्त्वाच्या ठिकाणी कर्मचारी तैनात केले होते. घाट भागात वाहनांना टप्प्याटप्प्याने पुढे सोडण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे काही वेळानंतर परिस्थिती हळूहळू नियंत्रणात येऊ लागली.

या दरम्यान सोशल मीडियावर व्हिडिओही समोर आले, ज्यामध्ये महामार्गावर वाहनांची मोठी रांग आणि मंद गतीने सुरू असलेली वाहतूक दिसून येत होती. विशेषतः डोंगराळ भागात ही कोंडी अधिक तीव्र असल्याचे स्पष्ट झाले.

सार्वजनिक सुट्ट्यांच्या काळात मुंबई आणि पुण्यातून लोणावळा तसेच आसपासच्या पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्यांची संख्या वाढते. त्यामुळे अशा प्रकारची कोंडी वारंवार निर्माण होते. घाटातील वळणे, चढ-उतार आणि अवजड वाहनांची वर्दळ यामुळेही वाहतुकीवर परिणाम होतो.

## रुपाली चाकणकर यांचे महिला प्रदेशाध्यक्षपद धोक्यात?

**पुणे, ता. २६ :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्या अडचणीत मोठी वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. मात्र आता त्यांच्याकडून महिला प्रदेशाध्यक्षपद देखील काढून घेतले जाण्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या त्यांच्याकडून या पदाचा राजीनामा घेणार असल्याचे वृत्त समोर येत आहे. या संदर्भात सुनेत्रा पवार यांचे निवासस्थान असलेल्या देवगिरी बंगल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची एक महत्त्वाची बैठक पार पडली.




या बैठकीत रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सुरुवातीला पक्षात त्यांच्या राजीनाम्यावरून दोन गट असल्याचे बोलले जात होते, परंतु या बैठकीत चाकणकर यांचा राजीनामा घेण्याबाबत सर्व नेत्यांचे एकमत झाल्याची माहिती मिळत आहे. बैठकीदरम्यान काही नेत्यांनी अशी भूमिका मांडली की, चाकणकर यांच्यामुळे पक्षाची प्रतिमा मलीन होत आहे. विशेषतः अशोक खरात प्रकरणामुळे त्यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले होते. हे प्रकरण गेल्या वर्षीच समोर आले असते, परंतु त्यांनी पोलीस आणि पत्रकारांवर दबाव आणल्याचा आरोप केला जात होता. याच कारणामुळे त्यांनी काही दिवसांपूर्वी वैयक्तिक कारणांचा हवाला देत महिला आयोगाच्या पदाचा राजीनामा दिला होता.

दुसरीकडे, नाशिकमधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला संघटनेकडूनही चाकणकर यांनी प्रदेशाध्यक्षपद सोडावे अशी मागणी जोर धरत होती. नाशिकमधील काही वरिष्ठ नेते या राजीनाम्यासाठी प्रचंड आग्रही होते. अखेर सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत या विषयावर शिक्कामोर्तब झाले असून, लवकरच त्या आपल्या पदाचा राजीनामा देण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील महिला राजकारणात मोठे फेरबदल पाहायला मिळू शकतात.

## त्याला ठार मारा! भोंदू खरात प्रकरणात संभाजी भिडे आक्रमक

**नाशिक, ता. २६ :** नाशिक मधील स्वयंघोषित बाबा अशोक खरात याच्याविरोधातील आरोपांचा पाढा दिवसेंदिवस वाढतच आहे. आता त्याच्याविरुद्ध नववा गुन्हा दाखल झाला असून, यावेळी तक्रार करणारी पीडिता अल्पवयीन मुलगी असल्याने प्रकरण अधिक गंभीर बनले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील या मुलीने काही महिन्यांपूर्वी खरातच्या संपर्कात आल्याचा दावा करत त्याच्यावर लैंगिक अत्याचाराचा आरोप केला आहे.




या प्रकरणाची पार्श्वभूमी पाहिली, तर अंधश्रद्धा आणि दैवी शक्तीच्या नावाखाली लोकांची फसवणूक करण्याचे प्रकार महाराष्ट्रात नवीन नाहीत. मात्र, या प्रकरणात धक्कादायक बाब म्हणजे अल्पवयीन मुलींनाही जाळ्यात ओढल्याचा संशय आहे. तक्रारीनुसार, खरातने स्वतःला शंकराचा अवतार असल्याचे सांगत मुलीचा विश्वास संपादन केला. तिच्या शैक्षणिक अडचणी दूर करण्यासाठी विशेष पूजा करण्याची गरज असल्याचे सांगून त्याने तिला फसवले आणि त्यानंतर अत्याचार केल्याचा आरोप आहे.

या आधीही खरातचे अनेक महिलांसोबतचे कथित व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते, ज्यामुळे त्याच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. आता अल्पवयीन मुलीची तक्रार समोर आल्यानंतर प्रकरणाची तीव्रता अधिक वाढली आहे. पोलिसांकडून इतर संभाव्य पीडितांचा शोध घेतला जात असून, हा प्रकार अधिक मोठ्या रॅकेटचा भाग असू शकतो का, याचीही चौकशी सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणावर संभाजी भिडे यांनी दिलेल्या वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण झाला आहे. त्यांनी आरोपीला ठार मारण्यासारखी कठोर शिक्षा सुचवली, ज्यामुळे समाजात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काही जणांनी या संतापाचे समर्थन केले असले, तरी अनेकांनी कायद्याबाहेरील अशा वक्तव्यांवर टीका केली आहे.

## ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे निधन

**कोल्हापूर, ता. २६ :** महाराष्ट्राच्या इतिहास संशोधन क्षेत्रातील एक भक्कम आणि विश्वासार्ह आवाज आज कायमचा शांत झाला. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे आज पहाटे निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते. मागील काही दिवसांपासून कोल्हापूरमधील खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते; मात्र प्रकृती खालावत गेल्याने अखेर त्यांनी अखेरचा श्वास घेतला.



३० डिसेंबर १९४१ रोजी सांगली जिल्ह्यातील तडसर येथे जन्मलेले डॉ. पवार यांनी शिवाजी विद्यापीठ येथे एम.ए. आणि पीएच. डी. पूर्ण करत इतिहास संशोधनाची भक्कम पायाभरणी केली. १९६४ साली विद्यापीठातील इतिहास विभागात दुर्मिळ कागदपत्रांच्या अभ्यासातून त्यांच्या संशोधन प्रवासाची सुरुवात झाली. पुढील ३० पेक्षा अधिक वर्षे त्यांनी प्राध्यापक म्हणून काम करत विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल चिकित्सक दृष्टी निर्माण केली.

डॉ. पवार यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी इतिहासाला केवळ गौरवकथांमध्ये अडकवून ठेवले नाही, तर पुराव्यांच्या आधारे सत्य मांडण्याचा आग्रह धरला. छत्रपती शिवाजी महाराज, महाराणी ताराबाई आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्यावर त्यांनी केलेले संशोधन आजही संदर्भग्रंथ मानले जाते. महाराणी ताराबाई, सेनापती संताजी घोरपडे आणि मराठेशाहीचा मागोवा यांसारख्या २५ हून अधिक ग्रंथांमधून त्यांनी मराठा इतिहासातील अनेक दुर्लक्षित पैलू उजेडात आणले.

विशेष म्हणजे, मराठा साम्राज्यातील स्त्री-शक्तीचे योगदान अधोरेखित करण्याचे काम त्यांनी सातत्याने केले. इतिहासाकडे भावनेपेक्षा पुराव्यांच्या नजरेतून पाहण्याची त्यांची भूमिका आजच्या पिढीसाठी महत्त्वाची शिकवण ठरते. कोल्हापूरमधील राजर्षी शाहू महाराज संशोधन केंद्र उभारण्यातही त्यांचा मोठा वाटा होता.

त्यांच्या निधनाचे महत्त्व एवढेच नाही की एक विद्वान व्यक्ती गेली; तर महाराष्ट्राने आपला चालता-बोलता इतिहास गमावला आहे. आजच्या काळात इतिहासाचे राजकारण होत असताना, वस्तुनिष्ठ आणि अभ्यासपूर्ण लेखन करणारे संशोधक दुर्मिळ होत चालले आहेत. अशा वेळी डॉ. पवार यांची उणीव अधिक तीव्रतेने जाणवणार आहे. त्यांच्या जाण्याने केवळ कोल्हापूर नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या वैचारिक विश्वात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

## जय श्रीरामच्या घोषात दुमदुमला रामदरा लाखो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

**लोणी काळभोर, ता. २६ :** लोणी काळभोर (ता. हवेली) येथील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र रामदरा शिवालयात रामनवमीचा रामजन्मोत्सव यंदा पारंपरिक विधी, भक्तिभाव आणि अभूतपूर्व उत्साहात गुरुवारी (ता. २६) साजरा करण्यात आला. दिवसभरात लाखापेक्षा अधिक भाविकांनी दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला. दहावी-बारावीच्या परीक्षा संपल्याने आणि शासकीय सुट्ट्यांमुळे यावर्षी भाविकांची संख्या नेहमीपेक्षा लक्षणीयरीत्या वाढली होती.



रामदरा शिवालयाचे संस्थापक १००८ देविपुरी महाराज उर्फ धुंदीबाबा यांनी सुमारे साठ वर्षांपूर्वी या तीर्थक्षेत्राची मुहूर्तमेढ रोवली. तेव्हापासून येथे रामनवमीचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्याची परंपरा अखंड सुरू आहे. आज पहाटे पाच वाजता महामस्तकाभिषेकाने उत्सवाची सुरुवात झाली आणि श्रींची विधिवत आरती करण्यात आली. दुपारी ढोल-ताशांच्या गजरात श्रीराम, धुंदीबाबा व मंगलपुरी महाराज यांच्या पादुकांची पारंपरिक मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत लोणी काळभोर, फुरसुंगी, पुणे, पिंपरी-चिंचवड, सातारा तसेच परप्रांतातून आलेल्या भाविकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

दुपारी बारा वाजता महंत हेमंतपुरी महाराज यांच्या हस्ते रामजन्मोत्सवाची मुख्य आरती पार पडली. त्यानंतर भंडारा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. पाडव्यापासून सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाचीही आज सांगता झाली. रामजन्माच्या सोहळ्यानंतर भाविकांना भात, आमटी आणि बुंदीचा महाप्रसाद देण्यात आला. दर्शन आणि प्रसादासाठी आबालवृद्धांची मोठी गर्दी उसळली होती. भाविकांच्या सुविधेसाठी स्वयंसेवकांनी विशेष प्रयत्नकेले.राष्ट्रीयस्वयंसेवकसंघाच्या कार्यकर्त्यांनी वाहनतळाचे नियोजन केले, तर लोणी काळभोर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

दरम्यान, पीएमपीएमएलकडून हडपसर-रामदरा मार्गावर जादा बससेवा सुरू करण्यात आल्याने भाविकांना मोठा दिलासा मिळाला. तरीही काही ठिकाणी रस्ता अरुंद असल्याने भविष्यात रस्ता रुंदीकरणाची आवश्यकता असल्याची चर्चा भाविकांमध्ये रंगली. सोशल मीडियावरील प्रचार, विविध माध्यमांतील प्रसिद्धी, रामनवमीची सुट्टी आणि परीक्षा संपल्याचा परिणाम म्हणून यंदा रामदरा येथे न भूतो न भविष्यती अशी भाविकांची गर्दी झाल्याचे चित्र दिवसभर पाहायला मिळाले. रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी भाविकांची अखंड रांग सुरूच होती.